
ePaper

# भारतीय ध्वज असलेल्या दोन जहाजांवर होर्मुझच्या सामुद्रधुनीत गोळीबार




वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 19 एप्रिल 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


पान 2 वरुन...

जाहिरात फलकांच्या ४०४ कोटींचा हिशेबच लागेना!

### पंतप्रधान नरेंद्र मोदींचा विरोधकांवर घणाघाती हल्ला

# विरोधकांकडून महिला आरक्षणाची भ्रूणहत्या

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**काँग्रेस आणि त्यांच्या सोबतच्या पक्षांनी नारीशक्ती वंदन विधेयकाला विरोध करत महिलांच्या अधिकारांचे भ्रूणहत्या केली. ज्या ज्या पक्षांनी महिलांच्या आरक्षणामध्ये अडथळे आणले त्यांना भविष्यात परिणाम भोगावे लागतील, असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला. या पक्षांनी महिला आरक्षणाला विरोध करत त्यांचा खरा चेहरा समोर आणला असंही नरेंद्र मोदी म्हणाले.**



महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचना संबंधित 131 वे घटनादुरुस्ती विधेयक संसदेत नामंजूर झाल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना संबोधित करत आपली भूमिका मांडली. काँग्रेसने इतिहास रचण्याची आणि महिलांच्या बाजूने उभे राहण्याची संधी गमावली असं नरेंद्र मोदी म्हणाले.

नरेंद्र मोदी म्हणाले की, “आज भलेही हे विधेयक पास करण्यासाठी 60 टक्के बहुमत आमच्याकडे नसेल, परंतु देशातील कोट्यवधी महिलांची आम्हाला साथ आहे. महिलांच्या अधिकारांमध्ये येणाऱ्या प्रत्येक अडचणी आम्ही दूर करू. आमचा विश्वास दृढ आहे. आम्ही फक्त त्या वेळेची वाट पाहतोय. काल आमच्याकडे संख्याबळ नाही म्हणजे आमचा पराभव झाला असं नाही. आमचा प्रयत्न थांबणार नाही. आमच्याकडे पुढे अनेक संधी येतील आणि आम्ही हा संकल्प पूर्ण करूच.”

भारतीय महिलांच्या इच्छांना रोखण्यात आलं, त्यांच्या स्वप्नांचा चक्काचूर करण्यात आला. आमच्यासाठी देशहित सर्वात प्रथम आहे. पण काही लोकांसाठी पक्षहित हे सर्वात मोठं होतं. त्यावेळी देशातील महिलांना त्याचे परिणाम भोगावे लागतात. यावेळीही असंच काहीतरी झालं. काँग्रेस, समाजवादी, डीएमके यांच्यामुळेही आता असंच घडलं.

देशातील कोट्यवधी महिला संसदेकडे डोळे लावून बसल्या होत्या. ज्यावेळी महिलांच्या हितासंबंधी संसदेत प्रश्न उपस्थित झाला आणि त्यांच्या अधिकारांवर गदा आली त्यावेळी काँग्रेस सारख्या परिवारवादी पक्ष टाळ्या वाजवत होते.

ज्यावेळी महिलांच्या अधिकारांवर गदा येते त्यावेळी त्याचा बदला घेतला जाईल. नारीशक्ती वंदन विधेयकाला ज्या लोकांनी विरोध केला, त्यांनी महिलांना गृहीत धरण्याची चूक केली. देशातील महिलांना विरोधकांची भूमिका समजली आहे. त्याचा परिणाम आता भोगावा लागणार आहे.

नारीशक्ती वंदन बिल हे प्रत्येकाला काहीतरी देणारं होतं, कुणाचेही काहीही काढून घेणारं नव्हतं. गेल्या 40 वर्षांपासून प्रलिंबित असलेलं ते बिल होतं. या माध्यमातून एकविसाव्या शतकातील महिलांना नवीन संधी देणारे आणि त्यांच्या वाटेतील अडचणी दूर करणारे होते. देशातील अर्ध्या लोकसंख्येला त्यांचा अधिकार देणारा तो प्रयत्न होता.

मतदारसंघ पुनर्रचना विधेयकामुळे महिलांच्या वाट्याला येणाऱ्या मतदारसंघांमध्ये मोठी वाढ होणार होती. परंतु काँग्रेसला ते नको असल्याने त्याला विरोध केला. काँग्रेसने ‘फोडा आणि राज्य करा’ हे सूत्र इंग्रजांपासून घेतलं आणि त्याचाच वापर त्यांनी यावेळी केला.

## काँग्रेसने नकारात्मक राजकारण केलं

काँग्रेस सातत्याने नकारात्मक राजकारण केलं. याच काँग्रेसने जनधन, आधार, डिजिटल पेमेंट यासह तिहेरी तलाक, कलम 370 हटवण्याला विरोध केला. समान नागरी आचरसंहितेला काँग्रेसने त्याला विरोध केला. सुधारणांचं नाव ऐकताच काँग्रेस विरोधाच्या भूमिकेत जाते. देशाला बळकटी देण्याच्या प्रत्येक प्रयत्नात काँग्रेसने विरोध केला. त्यांनी 'एक देश एक निवडणूक'ला विरोध केला. त्याचसोबत सर्वच सुधारणांना काँग्रेसने खोटं बोलत विरोध केला.

## महिला विधेयक नामंजूर


दरम्यान, महिला आरक्षण आणि मतदारसंघ पुनर्रचनेसाठीचं 131 वे घटनादुरुस्ती विधेयक संसदेत एकमतानं नामंजूर झालं आहे. यामुळे मोदी सरकारला मोठा धक्का बसल्याचं चित्र आहे. विधेयकाच्या बाजूनं 298 तर विधेयकाच्या विरोधात 230 मतं पडली. यामुळे लोकसभेत विधेयकाच्या बाजूनं सभागृहात दोन तृतीयांश बहुमत मिळवण्यात मोदी सरकारला मोठं अपयश आलं. सभागृहात एकूण 528 खासदारांनी मतदान केलं. त्यामुळे विधेयकाच्या मंजुरीसाठी आवश्यक असणारी आणखी 54 मतं मिळवण्यात सरकारला अपयश आलं. दरम्यान, 131 व्या घटनादुरुस्ती विधेयकाला मंजूर करुन घेण्यात अपयश आल्यानंतर केंद्र सरकारनं इतर दोन विधेयकं पटलावर मांडण्याआधीच मागे घेतली.

# जाहिरात फलकांच्या ४०४ कोटींचा हिशेबच लागेना!

## महापालिकेची कठोर भूमिका; नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई

**महाईन्यूज । पुणे**

**शहराच्या विविध भागांत बेकायदा पद्धतीने उभारण्यात आलेले जाहिरात फलक मोजण्यासाठी पुन्हा एकदा सल्लागार नियुक्तीचा घाट घालण्यात आला आहे. महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत हा प्रस्ताव मान्य करण्यात आला. स्थायी समितीच्या झालेल्या बैठकीत गेल्या काही दिवसांमध्ये आकाशचिन्ह विभागाने शहरातील ६७ बेकायदा जाहिरात फलकांवर कारवाई केल्याची माहिती दिली.**




तर, संपूर्ण शहरात एक ते दीड हजार बेकायदा जाहिरात फलक असावेत, अशी शक्यता व्यक्त करण्यात आली. ही निश्चित आकडेवारी समोर यावी, यासाठी सल्लागार नेमून संस्थेच्या माध्यमातून हे काम करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीच्या बैठकीत मांडून त्याला मान्यता देण्यात आली. महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी काही महिन्यांपूर्वी शहरातील बेकायदा जाहिरात फलकांचा आढावा घेतला होता.

महापालिकेच्या १५ क्षेत्रीय कार्यालयांना याची जबाबदारी देण्यात आली होती. त्यांच्याकडून सविस्तर माहिती मागवण्यात आली होती. त्यावेळी शहरात केवळ २०० जाहिरात फलक अनधिकृत असल्याचा दावा प्रशासनाने केला होता. मात्र स्थायी समिती अध्यक्ष भिमाले यांना माहिती देताना शहरात हजार ते दीड हजार बेकायदा होर्डिंग असण्याची शक्यता प्रशासनानेच व्यक्त केल्याने सहा महिन्यात ही संख्या २०० वरून हजार दीड हजारावर कशी गेली? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, महापालिकेच्या परवाना आणि आकाशचिन्ह विभागाकडे ४०४ कोटी रुपयांहून अधिक रक्कम वसुलीपात्र असल्याचे महापालिकेच्या लेखापरीक्षण अहवालात नमूद करण्यात आले आहे. गेल्या काही वर्षांतील ही रक्कम असून यामध्ये सुमारे ४०४ कोटी रुपयांचा हिशेब लागत नाही. आकाशचिन्ह आणि परवाना शुल्क विभागाकडे याचा हिशेब देण्याबाबत पत्रव्यवहार केला आहे. मात्र हा विभाग सविस्तर माहिती देण्यास विभाग टाळाटाळ करीत असल्याची तक्रार लेखापरीक्षण विभागाने केली.

वारंवार पत्र देऊनही आकाश चिन्ह विभागातील अधिकारी याची कोणतीही माहिती देत नसल्याने या प्रकरणाची गंभीर दखल घेत महापालिकेच्या मुख्य लेखापरीक्षकांनी आता थेट स्थायी समितीला पत्र लिहिले आहे. दोन वेगवेगळ्या कालखंडांतील मोठी थकबाकी समोर आल्याची माहिती या पत्रात देण्यात आली आहे.

### अधिकृत फलक लावणाऱ्यांकडे कोट्यवधींची थकबाकी

दरम्यान, शहरात अधिकृतपणे जाहिरात फलक लावणाऱ्यांकडे महापालिकेची ७० ते ८० कोटी रुपयांची थकबाकी असल्याची माहिती समोर आली आहे. ही थकबाकी एका महिन्यात वसूल करावी, असे आदेश स्थायी समितीच्या बैठकीत आकाशचिन्ह विभागाला दिले, अशी माहिती स्थायी समितीचे अध्यक्ष श्रीनाथ भिमाले यांनी दिली. पुढील आठ ते दहा दिवसांमध्ये शहरामध्ये बेकायदा जाहिरातफलक नक्की किती आहेत, याची सविस्तर माहिती समोर येईल, असेही भिमाले यांनी सांगितले.

## महापालिकेच्या १३ प्रभाग समित्या होणार बिनविरोध; दोन प्रभागात निवडणूक

**महाईन्यूज । पुणे**

**महापालिकेच्या १५ प्रभाग समित्यांच्या अध्यक्षपदासाठी शुक्रवारी अर्ज दाखल करण्यात आले. १५ पैकी १३ समित्यांची निवडणूक अपेक्षेप्रमाणे बिनविरोध होणार असून, दोन प्रभाग समित्यांच्या अध्यक्षपदासाठी निवडणूक होणार आहे. १३ पैकी १२ समित्यांचे अध्यक्षपद भाजपला मिळणार असून, एका समितीवर काँग्रेसचा अध्यक्ष असणार आहे.**




प्रभाग समित्यांच्या रचनेत हस्तक्षेप करून भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी मनमानी केल्याबद्दल उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार केल्यानंतर भाजपने राष्ट्रवादीला ढोलेपाटील रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रभाग समितीचे अध्यक्षपद दिले आहे. ढोले पाटील रोड आणि येरवडा वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयाच्या अध्यक्षपदासाठी निवडणूक होणार आहे.

महापालिका निवडणुकीनंतर प्रशासनाने १५ क्षेत्रीय कार्यालयांची पुनर्रचना केली आहे. क्षेत्रीय कार्यालयांच्या नव्या रचनेत पक्षीय बलाबलानुसार १४ क्षेत्रीय कार्यालयांच्या प्रभाग समित्यांवर भाजपचे वर्चस्व निर्माण होणार आहे, तर काँग्रेसला एक प्रभाग समिती मिळणार होती. यामध्ये महापालिकेत दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाला एकही प्रभाग समिती मिळणार नव्हती.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी याची तक्रार मुख्यमंत्र्यांकडे केली होती. त्यानंतर अहवाल सादर करण्याचे आदेश नगरविकास विभागाने ७ एप्रिल रोजी पालिकेला दिले. पण, प्रशासनाचा अहवाल अद्याप आलेला नाही. त्यामुळे या दोन क्षेत्रीय कार्यालयांच्या निवडणुका स्थगित कराव्यात, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे गटनेते नीलेश निकम यांनी केली.

या पार्श्वभूमीवर नगरसचिव कार्यालयाकडे प्रभाग समिती अध्यक्षपदासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. यामध्ये १३ प्रभाग समिती अध्यक्षपदांची निवडणुक बिनविरोध झाली. त्यापैकी १२ जागा भाजपला तर १ प्रभाग समितीचे अध्यक्षपद काँग्रेसला देण्यात आले आहे. तर, ढोले पाटील रोड प्रभाग समितीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने उमेदवारी अर्ज दाखल केला.

### बिनविरोध निवड झालेले प्रभाग समिती अध्यक्ष

- नगर रोड वाघोली – अनिल सातव
- छत्रपती शिवाजीनगर घोले रोड – अमृता म्हेत्रे
- औंध बाणेर – रोहिणी चिमटे
- कोथरूड बावधन – वासंती जाधव
- वारजे कर्वेनगर – मंजूश्री खर्डेकर
- सिंहगड रोड – सचिन मोरे
- धनकवडी कात्रज आंबेगाव – प्रतिभा चोरगे
- कोंढवा उंड्री – रंजना टिळेकर
- हडपसर मांजरी – प्रशांत उर्फ मामा तुपे
- बिबवेवाडी – मनीषा चोरबेले
- कसबा पेठ – उज्वला यादव
- विश्रामबागवाडा – राघवेंद्र मानकर (वरील सर्व अध्यक्ष भाजप)
- वानवडी – साहील केदारी (काँग्रेस)

येरवडा वडगावशेरी क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रभाग समितीसाठी भाजपच्या कविता गलांडे आणि काँग्रेसच्या विशाल मलके यांनी तर ढोले पाटील रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या प्रभाग समितीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या सुरेखा कवडे आणि काँग्रेसच्या वैशाली भालेराव यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

# शहरात आधुनिक क्रीडा सुविधांसाठी प्रयत्नशील!

## महापौर रवी लांडगे : मोहननगर येथील जलतरण तलावाचे लोकार्पण

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांसाठी जास्तीत जास्त क्रीडा सुविधा देण्याचा त्याचबरोबर क्रीडा साधने आधुनिक व दर्जेदार करण्याचा आमचा सातत्यपूर्ण प्रयत्न आहे,मोहननगर येथील जलतरण तलावाचे नूतनीकरण हे त्याच दिशेने उचललेले महत्त्वाचे पाऊल असून, यामुळे नागरिकांना आणि खेळाडूंना उत्कृष्ट सुविधा उपलब्ध होतील, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.**



पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मोहननगर येथील श्री छत्रपती राजर्षी शाहू महाराज जलतरण तलावाचे नूतनीकरण नुकतेच करण्यात आले,या कामाचा लोकार्पण सोहळा महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते उत्साहात पार पडला,त्यावेळी ते बोलत होते.

या प्रसंगी विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, आमदार उमा खापरे,शंकर जगताप यांच्यासह उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर तसेच कला, क्रीडा, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, नगरसदस्य प्रमोद कुटे, धर्मपाल तंतरपाळे,नगरसदस्या वैशाली काळभोर, अरुणा लंगोटे यांच्यासह उपायुक्त पंकज पाटील, अण्णा बोदडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आणि सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

छत्रपती राजर्षी शाहू महाराज जलतरण तलावाच्या नूतनीकरणाचे काम २० जून २०२४ पासून सुरू झाले होते त्यामध्ये जलतरण तलावाची खोली कमी करणे, तलाव आच्छादित करणे, वॉटरप्रूफिंग, नवीन फ्लोरिंग, नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था, स्वच्छतागृहाचे नूतनीकरण, अंतर्गत सुशोभीकरण, विद्युत विषयक कामे, आधुनिक फिल्टरेशन प्लँट बसविणे, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था तसेच रंगरंगोटी अशी विविध कामे करण्यात आली आहेत,यासाठी सुमारे र.रू.३ कोटी ९१ लाख इतका खर्च आलेला आहे. या सर्व कामांमुळे जलतरण तलाव अधिक सुरक्षित, स्वच्छ आणि आकर्षक बनला असून, नागरिकांना आणि खेळाडूंना उच्च दर्जाच्या सुविधा उपलब्ध होणार आहेत, अशी माहिती उप आयुक्त पंकज पाटील यांनी यावेळी दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पंकज पाटील यांनी,सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले तर आभार वैशाली काळभोर यांनी मानले.

> महानगरपालिकेकडून क्रीडा क्षेत्रासाठी उभारण्यात येणाऱ्या अशा सुविधा या केवळ पायाभूत कामे नसून, त्या शहराच्या उज्ज्वल क्रीडा भविष्यासाठीची गुंतवणूक आहेत. मोहननगर जलतरण तलावाचे नूतनीकरण ही त्याचीच प्रचिती असून, या सुविधांचा जास्तीत जास्त उपयोग करून स्थानिक खेळाडूंनी आपली गुणवत्ता सिद्ध करावी.
>
> **- आण्णा बनसोडे, उपाध्यक्ष, विधानसभा.**

> शहरात दर्जेदार क्रीडा सुविधा निर्माण करणे ही काळाची गरज आहे. मोहननगर जलतरण तलावाच्या नूतनीकरणामुळे नागरिकांना आणि विशेषतः महिलांना सुरक्षित व आधुनिक वातावरणात सराव करण्याची संधी मिळणार आहे. या सुविधांचा लाभ शहरातील जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा.
>
> **- उमा खापरे, आमदार, विधान परिषद.**

# प्रकल्पग्रस्तांना दिलासा! परवडणाऱ्या दरात घरांचे स्वप्न साकारण्याच्या उंबरठ्यावर!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत बेघरांसाठी घरे (HDH) प्रकल्पांतर्गत महत्त्वपूर्ण निर्णयास मंजुरी मिळण्याची शक्यता असून, प्रकल्पग्रस्त नागरिकांना दिलासा देणारा हा विषय ठरणार आहे.**




सि.स. नं. ६३६७ (स. नं. ११०) येथील आरक्षण क्र. ७९ वरील भूखंडावर राबविण्यात आलेल्या या प्रकल्पामध्ये सि.स. नं. ६३३३ (स. नं. ९९ पै) येथील झोपडीधारकांचे स्थलांतर करून पुनर्वसन करण्यात येत आहे. यासाठी यापूर्वीच प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली असून, एकूण १६१ सदनिका पात्र प्रकल्पग्रस्तांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

घरांच्या वाढलेल्या किमतीमुळे प्रकल्पग्रस्त नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली होती. यावर तोडगा काढताना, नागरिकांना पंतप्रधान आवास योजनेच्या दरांनुसार घरे उपलब्ध करून देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. नगररचना व विकास विभागाच्या प्रस्तावानुसार, २०२२-२३ च्या मूल्यांकन दरतक्त्यानुसार प्रत्येक सदनिकेची किंमत ११.०१ लाख रुपये निश्चित करण्यात आली असून, यास आयुक्तांनीही मान्यता दिली आहे.

या निर्णयामुळे रस्ताबाधित व प्रकल्पग्रस्त नागरिकांना लवकरात लवकर घर मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. मात्र, यासाठी काही अटी व शर्ती लागू करण्यात आल्या आहेत. सदनिकेची किंमत आणि मिळणारा मोबदला यातील फरक नागरिकांना भरावा लागणार असून, उलट परिस्थितीत अतिरिक्त रक्कम मनपामार्फत दिली जाणार आहे.



> “प्रकल्पग्रस्त नागरिकांना हक्काचे घर मिळणे हा त्यांचा मूलभूत अधिकार आहे. अनेक वर्षांपासून ते प्रतीक्षेत असून त्यांच्या अडचणी आम्ही जवळून पाहिल्या आहेत. त्यामुळेच हा प्रस्ताव पुढे आणत, परवडणाऱ्या दरात घरे उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला आहे. लवकरात लवकर सर्व पात्र कुटुंबांचे पुनर्वसन पूर्ण व्हावे, यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.”
>
> **- कृष्णा सुरकुले, नगरसेवक, भाजपा.**



> “महिलांसह सर्वच कुटुंबांना सुरक्षित आणि स्थिर निवारा मिळणे अत्यंत गरजेचे आहे. या प्रकल्पामुळे अनेक कुटुंबांचे आयुष्य स्थिर होणार आहे. नागरिकांची गैरसोय दूर करून त्यांना सन्मानाने जगता येईल असे घर देणे, हे आमचे कर्तव्य आहे. हा निर्णय त्यांच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरेल.”
>
> **- सारिका गायकवाड, नगरसेविका, भाजपा.**

तसेच, सदनिकांमध्ये कोणतेही अंतर्गत किंवा बाह्य बदल करण्यास मनाई राहणार आहे. देखभाल खर्च, वीज-पाणी बिल, कर तसेच सहकारी गृहनिर्माण संस्थेचे शुल्क संबंधित लाभार्थ्यांनाच भरावे लागणार आहे. पार्किंग सुविधा सामायिक स्वरूपात राहणार असून, त्याठिकाणी कोणतेही बांधकाम करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

या प्रस्तावास स्थायी समितीची मंजुरी मिळाल्यानंतर आता अंतिम निर्णयासाठी तो सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात आला आहे. हा विषय मंजूर झाल्यास, अनेक वर्षांपासून घराच्या प्रतीक्षेत असलेल्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, त्यांच्या पुनर्वसनाचा मार्ग अधिक वेगाने सुकर होणार आहे.



## भूमिका

**नाशिक आणि अमरावती येथे समोर आलेल्या दोन गंभीर घटनांनी महाराष्ट्रातील सामाजिक आणि कायदेशीर व्यवस्थेसमोर महत्त्वाचे प्रश्न उभे केले आहेत. या दोन्ही प्रकरणांमध्ये मूळ मुद्दा हा महिलांवरील अत्याचार आणि लैंगिक शोषणाचा असताना, त्याला धार्मिक रंग देण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसून येते.**

# धर्माच्या धुरात हरवणारे सत्य

परिणामी, गुन्ह्याची तीव्रता आणि पीडितांना न्याय मिळवून देण्याची प्रक्रिया यापेक्षा धार्मिक वादच अधिक चर्चेत राहिला. ही प्रवृत्ती केवळ धोकादायकच नाही, तर समाजाच्या एकात्मतेलाही बाधा पोहोचवणारी आहे.




नाशिकमधील टाटा कन्सल्टन्सी सर्विसेस प्रकल्पात महिला कर्मचाऱ्यांनी केलेल्या तक्रारींवरून गंभीर स्वरूपाचे आरोप समोर आले. वरिष्ठांकडून पदाचा गैरवापर करून कनिष्ठांवर मानसिक दबाव टाकणे, जबरदस्तीने वैयक्तिक संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न, तसेच काही प्रकरणांत धार्मिक बाबींमध्ये हस्तक्षेप—हे सर्व आरोप अत्यंत चिंताजनक आहेत. या प्रकरणात अनेक गुन्हे दाखल होऊन आरोपींना अटक झाली आहे, तर काही जण फरार आहेत. या तक्रारींनी कॉर्पोरेट क्षेत्रातील कार्यसंस्कृती आणि महिला सुरक्षेचा मुद्दा अधोरेखित केला आहे. तथापि, काही गटांनी याला “कॉर्पोरेट जिहाद” असे नाव देत धार्मिक स्वरूप देण्याचा प्रयत्न केला, ज्यामुळे मूळ प्रश्न दुय्यम ठरू लागला.

दुसरीकडे, अमरावतीतील प्रकरण सुरुवातीला “लव्ह जिहाद” म्हणून चर्चेत आले. परंतु तपासात उघड झाले की, हा संघटित धार्मिक कट नसून अल्पवयीन मुलींना फसवून त्यांचे लैंगिक शोषण व ब्लॅकमेलिंग करण्याचा गुन्हेगारी प्रकार आहे. विशेष म्हणजे, या प्रकरणातील पीडित मुली मुस्लिम समाजातीलच असल्याचे स्पष्ट झाले. यामुळे सुरुवातीला केलेले “धर्माधारित लक्ष्यीकरण”चे दावे फोल ठरले. तरीही, या घटनेला राजकीय आणि धार्मिक रंग देण्याचा प्रयत्न झाला, ज्यामुळे समाजात संभ्रम आणि तणाव निर्माण झाला.

या दोन्ही घटनांमधून एक समान धागा स्पष्ट दिसतो गुन्ह्याला धर्माचे लेबल लावण्याची घाई. जेव्हा एखाद्या गुन्ह्याला धार्मिक चौकटीत बसवले जाते, तेव्हा त्याची वस्तुनिष्ठ तपासणी आणि न्यायप्रक्रिया यावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण होते. समाजात भीती, अविश्वास आणि द्वेषाचे वातावरण तयार होते. परिणामी, पीडितांचा आवाज आणि त्यांच्या न्यायाची लढाई दुय्यम ठरते.

गुन्हेगार कोणत्याही धर्माचा असो, त्याचा गुन्हा हा त्याच्या वैयक्तिक कृत्याशी संबंधित असतो, संपूर्ण समाजाशी नव्हे. त्यामुळे अशा घटनांकडे पाहताना संयम, विवेक आणि तथ्यांवर आधारित दृष्टिकोन आवश्यक आहे. कायद्याच्या चौकटीत राहून, पुराव्यांच्या आधारेच कारवाई झाली पाहिजे. अन्यथा, समाजात अनावश्यक ध्रुवीकरण वाढते आणि न्यायप्रक्रियेवरील विश्वास कमी होतो.

महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात सामाजिक ऐक्य आणि विवेकशीलता ही मूल्ये जपणे अत्यंत गरजेचे आहे. माध्यमे, राजकीय नेते आणि समाजातील जबाबदार घटकांनी संवेदनशीलतेने वागणे आवश्यक आहे. अपूर्ण माहितीवर आधारित निष्कर्ष काढणे टाळले पाहिजे. प्रत्येक घटनेचा सखोल आणि निष्पक्ष तपास होणे हेच खरे न्यायाचे तत्त्व आहे.

शेवटी, या घटनांमधून समाजाने एक महत्त्वाचा धडा घेणे आवश्यक आहे. गुन्हा हा गुन्हाच असतो, त्याला धर्माचे लेबल लावणे अन्यायकारक आणि घातक आहे. वास्तविक समस्या ओळखून त्यावर ठोस उपाययोजना केल्यासच समाज अधिक सुरक्षित आणि सुदृढ होऊ शकतो.

## प्रासंगिक »

### जोतीष्यची फजिती

**एका नगरात एक भामटा ज्योतिषी दररोज एका रस्त्याच्या कडेला बसून लोकांचे भविष्य सांगत असायचा. दररोज तो समोर जन्मकुंडल्या घेऊन एक महान ज्योतिषी आणि हस्तरेखा तज्ञ असल्याचे लोकांसमोर सांगत असायचा.**

लोकही त्याला आपले भविष्य विचारत. मग तो त्यांचे भविष्य सांगून त्यांना खुश करीत असायचा. अशा प्रकारे त्याने अमाप धनदौलत कमावली एके दिवशी तो लोकांचे भविष्य सांगण्यात गुंतला असताना एक व्यक्ती त्याच्याकडे पळत-पळत येतो आणि म्हणतो की , तुमच्या घरामध्ये चोरी झाली आहे त्यावर तो आपल्या घराकडे जात असताना मध्येच त्याला एक व्यक्ती अडवतो आणि अशाप्रकारे धावण्याचे कारण विचारतो. यावर तो ज्योतिषी स्वत:च्या घरी चोरी झाल्याचे सांगतो .यावर तो व्यक्ती म्हणतो ,ही गोष्ट अतिशय आश्चर्यकारक आहे की, जो व्यक्ती दुसऱ्या लोकांचे दुर्भाग्य ओळखतो . त्याला स्वत:च्या दुर्भाग्याबद्दल माहित नाही. यावर तो ज्योतिषी शरमेने मन खाली घालतो आपला घमंडी ,भामटेपणा लोकांसमोर व्यक्त करत असतो.

- तात्पर्य :

ज्योतिष, भविष्य सांगणार्यावर विश्वस ठेऊ नये.

भारतीय संस्कृतीत प्रत्येक सणाचा एक वेगळा अर्थ, परंपरा आणि सामाजिक संदेश दडलेला असतो. त्यापैकीच एक अत्यंत शुभ आणि पवित्र मानला जाणारा सण म्हणजे अक्षय तृतीया. ‘अक्षय’ म्हणजे कधीही न संपणारे, सतत वाढत राहणारे.

# परंपरेतून समृद्धीकडे, नव्या संकल्पांची सुवर्णसंधी

त्यामुळे या दिवशी केलेले पुण्यकर्म, दानधर्म, तसेच सुरू केलेले नवे उपक्रम हे अक्षय फलदायी ठरतात, अशी श्रद्धा आहे.

अक्षय तृतीया हा सण केवळ धार्मिक परंपरांपुरता मर्यादित नाही, तर तो आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातूनही महत्त्वाचा ठरतो. या दिवशी सोने खरेदी करण्याची परंपरा प्रचलित आहे. मात्र, आजच्या बदलत्या काळात या परंपरेचा अर्थ अधिक व्यापक करण्याची गरज आहे. केवळ सोन्यात गुंतवणूक करण्याऐवजी ज्ञान, कौशल्य, शिक्षण आणि आरोग्य यामध्ये गुंतवणूक करणेही तितकेच ‘अक्षय’ ठरू शकते.

आजच्या वेगवान आणि स्पर्धात्मक युगात अक्षय तृतीया आपल्याला थांबून विचार करण्याची संधी देते की आपण कोणत्या गोष्टींची साठवण करत आहोत? केवळ भौतिक संपत्तीची, की नैतिक मूल्यांची? समाजात वाढत चाललेली असमानता, पर्यावरणीय संकटे आणि मानवी नात्यांतील दुरावा पाहता, या सणाचा खरा अर्थ समजून




घेणे अधिक आवश्यक ठरते.

अक्षय तृतीया आपल्याला ‘देण्याची’ शिकवण देते. गरजूंसाठी अन्नदान, शिक्षणासाठी मदत, पर्यावरण संवर्धनासाठी प्रयत्न हीच खरी अक्षय गुंतवणूक आहे. आजच्या पिढीने या सणाला केवळ खरेदीच्या चौकटीत न ठेवता, सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीने साजरा करणे गरजेचे आहे.

तसेच, कृषीप्रधान भारतात हा दिवस शेतकऱ्यांसाठीही विशेष महत्त्वाचा मानला जातो. नव्या हंगामाच्या सुरुवातीचे प्रतीक म्हणून हा दिवस पाहिला जातो. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही या सणामुळे चालना मिळते. परंपरा आणि आधुनिकता यांचा समतोल साधत हा सण साजरा करणे हीच काळाची गरज आहे.

अखेर, अक्षय तृतीया हा केवळ शुभमुहूर्त नसून, नव्या संकल्पांची सुरुवात करण्याचा दिवस आहे. प्रत्येकाने आपल्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याचा निर्धार करावा. समाजहित, पर्यावरण रक्षण आणि मानवी मूल्यांची जपणूक, या त्रिसूत्रीवर आधारित संकल्प केल्यास, खऱ्या अर्थाने ‘अक्षय’ समृद्धीचा मार्ग खुला होईल. यंदाच्या अक्षय तृतीयेला आपण सर्वांनी मिळून एक संकल्प करूया समृद्धीचा अर्थ केवळ संपत्तीत नाही, तर संवेदनशीलतेत, सहकार्यत आणि सामाजिक जबाबदारीतही आहे. हाच या सणाचा खरा संदेश आहे. अक्षय तृतीया ही केवळ परंपरेची पुनरावृत्ती नसून, ती विचारांची नव्याने पेरणी करण्याची संधी आहे. आधुनिक जीवनशैलीत बदल घडत असताना, या सणाच्या माध्यमातून मूल्याधिष्ठित जीवनाची जाणीव अधिक दृढ करता येऊ शकते.

## ।। अभंगवाणी ।।



आधिल्या भ्रतारें काम नव्हे पुरा ।
म्हणोनि व्यभिचारा टेकलियें ॥१॥

रात्रंदिस मज पाहिजे जवळी ।
क्षण त्यानिराळी न गमे घडी ॥२॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# आगामी काळात नारीशक्ती उत्तर देईल!

## महिला आरक्षण विधेयक नामंजूर; उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवारांचा विरोधकांवर घणाघात

**महाईन्यूज | मुंबई**

**विधिमंडळ आणि संसदेत महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारे १३१ वे घटनादुरुस्ती विधेयक लोकसभेत मंजूर होऊ शकले नाही. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी तीव्र संताप व्यक्त केला असून, “कालचा दिवस भारतीय लोकशाहीसाठी लाजिरवाणा ठरला,” अशा शब्दांत त्यांनी विरोधकांच्या भूमिकेचा निषेध केला आहे. त्यांनी या प्रकरणावरून विरोधकांची ‘महिला-विरोधी मानसिकता’ पुन्हा एकदा उघडी पडल्याची टीका सोशल मीडियावर केली आहे.**



सुनेत्रा पवार यांनी सोशल मीडिया आणि प्रसिद्धी पत्रकाद्वारे आपली भूमिका स्पष्ट करताना म्हटले की, हे विधेयक केवळ तांत्रिक कारणांमुळे रखडले नसून ते जाणीवपूर्वक मंजूर होऊ दिले गेले नाही. “महिला सशक्तीकरणाच्या गप्पा मारणारे प्रत्यक्षात महिलांच्या हक्कावर घाला घालत आहेत. जे राजकारण महिलांच्या प्रगतीला रोखते, ते लोकशाहीसाठी घातक आहे,” असे त्या म्हणाल्या.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या संवेदनशील विषयावर सर्व पक्षांनी एकत्र येण्याचे आवाहन केले होते. मात्र, विरोधकांनी या आवाहनाला प्रतिसाद न देता नकारात्मक भूमिका घेतली. यावर भाष्य करताना उपमुख्यमंत्री म्हणाल्या, “पंतप्रधानांच्या एकत्र येण्याच्या आवाहनाला दिलेला नकार हा केवळ राजकीय अहंकार नाही, तर तो देशातील अर्ध्या लोकसंख्येवर म्हणजेच महिलांवर केलेला अन्याय आहे. ज्यांनी जाणीवपूर्वक हे विधेयक रोखले, त्यांनी महिला शक्तीचा अपमान केला आहे.”

### नारीशक्ती गप्प बसणार नाही

महिला आरक्षणाची लढाई प्रदीर्घ काळापासून सुरू आहे. हे विधेयक मंजूर न झाल्याने महिलांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. मात्र, ही लढाई इथेच थांबणार नाही, असा निर्धार सुनेत्रा पवार यांनी व्यक्त केला आहे. त्यांनी इशारा दिला की, “महिलांच्या हक्कासाठीचा हा संघर्ष सुरूच राहील. ज्यांनी आज अडथळे निर्माण केले आहेत, त्यांना देशातील नारीशक्ती येणाऱ्या काळात योग्य ते उत्तर दिल्याशिवाय राहणार नाही.”

### लोकशाहीसाठी काळा दिवस

एकीकडे देश महासत्तेच्या दिशेने पाऊल टाकत असताना आणि महिला प्रत्येक क्षेत्रात आपले कर्तृत्व सिद्ध करत असताना, धोरणनिर्णय प्रक्रियेत त्यांना स्थान देण्यास नकार देणे ही खेदाची बाब असल्याचे पवारांनी नमूद केले. या प्रकरणावरून आता सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात कलगीतुरा रंगण्याची शक्यता निर्माण झाली असून, आगामी काळात महिला आरक्षणाचा मुद्दा पुन्हा एकदा केंद्रस्थानी राहण्याचे संकेत मिळत आहेत.

## कृत्रिमरित्या फळे पिकवणाऱ्यांवर एफएसएसएआयचे लक्ष; ‘मसाला’ वापरास बंदी

**महाईन्यूज | मुंबई**

**आंबा, केळी, पपई यांसारखी फळे कृत्रिमरित्या पिकवण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या कॅल्शियम कार्बाईडचा (मसाला) वापर पूर्णपणे बंद करण्याचे निर्देश भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणने (एफएसएसएआय) दिले आहे.**



मात्र असे असतानाही अनेक ठिकाणी त्याचा वापर होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे हंगामी फळांच्या साठवणुकीदरम्यान याचा वापर होण्याची शक्यता लक्षात घेऊन फळबाजार, मंडई, गोदामे, घाऊक विक्रेते आणि वितरण केंद्रांवर विशेष तपासणी मोहीम राबविण्याचे निर्देश एफएसएसएआयने राज्यांना दिले आहेत.

फळ व्यावसायिक झटपट व अधिक फायदा मिळविण्यासाठी आंबा, केळी, पपई यांसारखी फळे कृत्रिमरित्या पिकवण्यासाठी कॅल्शियम कार्बाईडचा (मसाला) वापर करत असल्याचे अनेकदा उघडकीस आले आहे. कॅल्शियम कार्बाईडमुळे नागरिकांना गिळताना त्रास होणे, उलट्या, त्वचेवर जखमा यासारखे गंभीर आरोग्यदोष उद्भवण्याची शक्यता असते. त्यामुळे एफएसएसएआयने २०११ च्या अन्न सुरक्षा नियमांनुसार कॅल्शियम कार्बाईडच्या वापरावर बंदी घातली आहे.

त्याचप्रमाणे काही अन्न व्यवसायिक केळी व इतर फळे पिकवण्यासाठी ती ‘इथिफोन’ द्रावणात बुडवत असल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र, एफएसएसएआयच्या मार्गदर्शक सूचनांनुसार फळांचा थेट संपर्क इथिलीन वायूच्या द्रव किंवा पावडर स्वरूपाशी होणे पूर्णपणे घातक आहे.

हंगामी फळांच्या साठवणुकीदरम्यान ‘मसाला’सारख्या रसायनांचा वापर होण्याची शक्यता अधिक आहे. ही बाब लक्षात घेऊन सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेशातील अन्न सुरक्षा आयुक्त आणि प्रादेशिक अधिकाऱ्यांना विशेष तपासणी मोहीम राबविण्याचे निर्देश एफएसएसएआयने दिले आहेत. तसेच फळबाजार, मंडई, गोदामे, घाऊक विक्रेते आणि वितरण केंद्रांवर कडक नजर ठेवण्याचेही आदेश देण्यात आले आहेत.

अधिकाऱ्यांना फळांच्या पेट्यांजवळ किंवा साठवण जागेत कॅल्शियम कार्बाईड आढळल्यास ते पुरावा मानून संबंधित अन्न व्यवसायिकांविरुद्ध अन्न सुरक्षा कायद्याच्या कलम ५९ अंतर्गत कारवाई करण्याचे अधिकार दिले आहेत. तसेच, कृत्रिम रंग, मेण यांसारख्या अप्रमाणित घटकांचा वापर केल्याचे आढळल्यास संबंधितांविरोधात कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

### 'स्ट्रिप पेपर टेस्ट’चा वापर करण्याचे आदेश

फळे पिकवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या गोदामांमध्ये ॲसिटिलीन वायूचा शोध घेण्यासाठी ‘स्ट्रिप पेपर टेस्ट’चा वापर करण्यासही अधिकाऱ्यांना सांगण्यात आले आहे. देशभरात फळे कृत्रिमरित्या पिकवण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या धोकादायक रसायनांवर आळा घालण्यासाठी एफएसएसएआयने हे कडक निर्देश राज्य व केंद्रशासित प्रदेशांना दिले आहेत.

# 'होर्मुझची सामुद्रधुनी' पुन्हा बंद!

## इराणचा अमेरिकेवर 'वचनभंग' आणि 'नाकेबंदी'चा आरोप

महाईन्यूज । इराण

**लेबनॉनमधील युद्धविराम करारांनंतर शुक्रवारी उघडलेली होर्मुझची सामुद्रधुनी अवघ्या २४ तासांत इराणने पुन्हा बंद केली आहे. अमेरिकेने आपल्या बंदरांवरील नाकेबंदी कायम ठेवून 'वचनभंग' केल्याचा आरोप करत इराणने या जागतिक स्तरावर महत्त्वाच्या असलेल्या जलमार्गावर पुन्हा "कडक नियंत्रण" मिळवल्याचे शनिवारी जाहीर केले.**




इराणच्या 'इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स' (IRGC) ने निवेदनात म्हटले आहे की, अमेरिकेने इराणच्या बंदरांकडे जाणाऱ्या आणि येणाऱ्या जहाजांची नाकेबंदी अद्याप हटवलेली नाही. इराणने या कृतीला "समुद्री चाचेगिरी" असे संबोधले आहे. 'चाचेगिरी' म्हणजे समुद्रात किंवा जलमार्गावर जहाजांचे अपहरण करणे, माल लुटणे, सशस्त्र दरोडा टाकणे किंवा खासगी फायद्यासाठी हिंसाचार करणे. त्यामुळे जोपर्यंत अमेरिका इराणच्या जहाजांना पूर्ण स्वातंत्र्य देत नाही, तोपर्यंत होर्मुझच्या सामुद्रधुनीची स्थिती "पूर्ववत" (बंद) राहील, असा इशारा इराणने दिला आहे.

दुसरीकडे, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी स्पष्ट केले आहे की, इराणशी संबंधित व्यवहार १००% पूर्ण होत नाही तोपर्यंत अमेरिकन नौदलाची नाकेबंदी पूर्ण ताकदीने सुरूच राहील. ट्रम्प यांनी 'ट्रुथ सोशल'वर पोस्ट करत म्हटले की, "होर्मुझची सामुद्रधुनी व्यापारासाठी खुली आहे, परंतु इराणच्या बाबतीत अमेरिकेची नाकेबंदी तोपर्यंत सुरू राहील जोपर्यंत आमचा इराणसोबतचा करार पूर्ण होत नाही."

हॉर्मुझची सामुद्रधुनी हा एक अरुंद पण अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे, जिथून जगातील २०% तेल आणि वायूचा पुरवठा होतो. २८ फेब्रुवारी रोजी इराणवर अमेरिका-इस्रायलने केलेले हल्ले आणि त्यानंतर इराणने आखाती देशांवर केलेल्या प्रतिहल्ल्यांनंतर हा मार्ग व्यावसायिक शिपिंगसाठी पूर्णपणे निरुपयोगी झाला होता. ४७ दिवस जहाजांनी एकतर हा मार्ग टाळला किंवा त्यांना कडक निर्बंधांचा सामना करावा लागला. या अडथळ्यामुळे जागतिक व्यापारावर, विशेषतः ऊर्जा पुरवठ्यावर परिणाम झाला आणि कच्च्या तेलाच्या किमतीत मोठी वाढ झाली.

### इराणच्या नव्या अटी

इराणच्या संसदीय आयोगाचे प्रमुख इब्राहिम अझीझी यांनी जाहीर केले आहे की, केवळ IRGC ने अधिकृत केलेली व्यापारी जहाजेच या मार्गावरून जाऊ शकतील आणि या जहाजांना प्रवास करण्यासाठी इराणला 'टोल' (शुल्क) भरावा लागेल.

### पुढील पाऊल काय?

अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील हा तणाव निवळण्यासाठी सोमवारी पाकिस्तानची राजधानी इस्लामाबाद येथे चर्चेची दुसरी फेरी होणार आहे. या युद्धजन्य परिस्थितीवर तोडगा निघणार की ऊर्जा संकट अधिक गडद होणार, याकडे आता संपूर्ण जगाचे लक्ष लागले आहे.

# धक्कादायक! मेटा १६ हजार कर्मचाऱ्यांना कामावरून काढणार

महाईन्यूज । नवी दिल्ली

**ओरॅकलने ३० हजार कर्मचाऱ्यांची कपात केल्यानंतर आता मेटा प्लॅटफॉर्मनेही मोठ्या प्रमाणात कर्मचारी कपात करण्याची तयारी सुरू केली आहे. मेटामधून जवळपास १६हजार कर्मचाऱ्यांच्या नोकऱ्या जाण्याची शक्यता आहे. 'रॉयटर्स'ने या प्रकरणाशी संबंधित सूत्रांच्या हवाल्याने दिलेल्या वृत्तानुसार, या कपातीचा पहिला टप्पा २० मे पासून सुरू होऊ शकतो, ज्याचा फटका साधारण ८,००० कामगारांना बसेल.**




फेसबुक, इंस्टाग्राम आणि व्हॉट्सॲपची मेटा ही मूळ कंपनी आहे. २०२६ मध्ये नियोजित केलेली ही कर्मचारी कपात मार्क झुकरबर्गच्या कंपनीतील आतापर्यंतची सर्वात मोठी पुनर्रचना असू शकते. कंपनी सध्या आर्टिफिशियल इंटेलिजन्सवर (AI) लक्ष केंद्रित करत असून भविष्यासाठी आपल्या कार्यबलाला नवीन आकार देत आहे.

पहिल्या टप्प्यात मेटाच्या जागतिक कर्मचाऱ्यांपैकी सुमारे १० टक्के कर्मचारी कमी केले जाण्याची शक्यता आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, २०२६ च्या उत्तरार्धात आणखी कपात होऊन हा आकडा १६,००० पर्यंत पोहोचू शकतो.

मेटाचे सीईओ मार्क झुकरबर्ग यांनी गेल्या वर्षभरात कंपनीला एआय क्षेत्रात आघाडीवर नेण्यावर भर दिला आहे. कंपनी यासाठी सुमारे १३५ अब्ज डॉलर्सचा भांडवली खर्च करणार आहे, जो प्रामुख्याने डेटा सेंटर्स, चिप्स आणि सॉफ्टवेअर डेव्हलपमेंटसाठी वापरला जाईल.

कर्मचाऱ्यांची उत्पादकता आणि 'एआय'मधील त्यांची प्रगती या आधारावर कर्मचारी कपातीचा तपशील अंतिम केला जात असल्याचे समजते.

### ओरॅकलमध्ये ३० हजार कर्मचाऱ्यांची कपात

ओरॅकल या कंपनीनेही काही दिवसांपूर्वी मोठी कपात केली. सकाळी ६ वाजता मेल पाठवून कर्मचाऱ्यांना नोकरीवरून कमी करण्यात आल्याचे सांगण्यात आले. यामध्ये १२ हजार भारतीयांचा समावेश आहे.

### यापूर्वीची कपात

याआधी २०२२ आणि २०२३ मध्ये मेटाने 'इयर ऑफ एफिशिएन्सी' अंतर्गत सुमारे २१,००० कर्मचाऱ्यांना कामावरून काढले होते.

### बदलता ट्रेंड

केवळ मेटाच नाही, तर ॲमेझॉन आणि ब्लॉक (BLOCK) सारख्या इतर बड्या टेक कंपन्यांनीही एआयमुळे येणाऱ्या कार्यक्षमतेचा दाखला देत हजारो कर्मचाऱ्यांची कपात केली आहे. 'LAYOFFS.FYI' च्या आकडेवारीनुसार, या वर्षात आतापर्यंत ९५ कंपन्यांमधील ७३,००० हून अधिक टेक कर्मचाऱ्यांनी आपल्या नोकऱ्या गमावल्या आहेत.



# डेजी शाहचा धक्कादायक खुलासा

बॉलिवूड अभिनेत्री डेजी शाह हिने नुकताच आपल्या करिअरच्या सुरुवातीच्या काळातील एक धक्कादायक अनुभव उघड केला आहे. चित्रपटसृष्टीत आपली ओळख निर्माण करत असताना तिला कास्टिंग काउचसारख्या परिस्थितीला सामोरं जावं लागलं, असं तिने सांगितलं. तिच्या या खुलाशामुळे पुन्हा एकदा फिल्म इंडस्ट्रीतील या गंभीर विषयावर चर्चा सुरू झाली आहे. डेजी शाहने एका मुलाखतीदरम्यान सांगितलं की, हा प्रकार तिच्या करिअरच्या सुरुवातीच्या दिवसांमध्ये घडला होता. त्या वेळी ती वेगवेगळ्या चित्रपट निर्मात्यांना भेटत होती आणि ऑडिशन्स देत होती. अशाच एका प्रसंगी तिची भेट साऊथमधील एका फिल्ममेकरशी झाली, जो मुंबईत ऑडिशन घेत होता. ती सांगते की, ती त्या व्यक्तीला साध्या मीटिंगसाठी भेटायला गेली होती. मात्र, त्या भेटीदरम्यान घडलेली घटना तिच्यासाठी अत्यंत अस्वस्थ करणारी ठरली. डेजीच्या म्हणण्यानुसार, त्या फिल्ममेकरने संभाषणादरम्यान तिच्या परवानगीशिवाय तिला स्पर्श केला आणि तिचा हात पकडला. हा प्रकार तिला अजिबात पसंत नव्हता आणि त्यामुळे ती खूप अस्वस्थ झाली. या घटनेनंतर डेजी शाहने तात्काळ त्या व्यक्तीपासून अंतर ठेवण्याचा निर्णय घेतला. तिने स्पष्ट सांगितलं की, कोणाच्याही परवानगीशिवाय अशा प्रकारे स्पर्श करणं पूर्णपणे चुकीचं आहे आणि ते कोणत्याही परिस्थितीत स्वीकारार्ह नाही. तिने त्या फिल्ममेकरशी पुन्हा कधीही संपर्क साधला नाही.



## दाक्षिणात्य सेट अधिक शांत; एली अवराम

तमिळ, कन्नड आणि हिंदी चित्रपटांमध्ये काम केलेली अभिनेत्री एली अवराम हिने बॉलिवूड आणि दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील कामाच्या पद्धतीतील फरकांबाबत आपले अनुभव शेअर केले आहेत. दोन्ही इंडस्ट्रींनी तिला खूप काही शिकवले असले तरी, दाक्षिणात्य चित्रपटांच्या सेटवरील वातावरण अधिक शांत, सुव्यवस्थित आणि आदरपूर्ण असल्याचे तिने सांगितले. 'बॉलिवूड बबल'ला दिलेल्या मुलाखतीत एली म्हणाली की, दोन्ही ठिकाणी कामाचा अनुभव चांगला होता, मात्र कामाची पद्धत वेगळी आहे. "दाक्षिणात्य चित्रपटांच्या सेटवर शांतता जास्त असते, तर बॉलिवूडमध्ये सर्व काही खूप वेगाने घडते. तिथे लोक ओरडण्याऐवजी वॉकी-टॉकीचा वापर करतात," असे तिने स्पष्ट केले.



# जन्नत जुबैर २५व्या वर्षी कोट्यवधींची मालकीण!



अभिनेत्री आणि सोशल मीडिया स्टार जन्नत जुबैर रहमानी हिने खूप लहान वयात करिअर सुरू करून आज मोठं यश मिळवलं आहे. अवघ्या २४व्या वर्षी ती देशातील सर्वाधिक कमाई करणाऱ्या आणि लोकप्रिय डिजिटल क्रिएटर्सपैकी एक बनली आहे. टीव्ही इंडस्ट्री सोडून तिने कंटेंट क्रिएशनच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची कमाई केली आहे. जन्नतने केवळ ७ वर्षांची असताना अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवलं. बालकलाकार म्हणून तिने अनेक मालिकांमध्ये काम केलं आणि प्रेक्षकांच्या मनात घर केलं. 'फुलवा' या मालिकेमुळे ती विशेष प्रसिद्ध झाली. त्याशिवाय तिने 'माटी की बन्नो' आणि 'भारत का वीर पुत्र-महाराणा प्रताप' यांसारख्या मालिकांमध्येही काम केलं. त्यामुळे ती घराघरात ओळखली जाऊ लागली. २०१८ पर्यंत जन्नतने टीव्हीवर काम केलं, पण नंतर तिने हा मार्ग सोडण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय तिच्यासाठी सोपा नव्हता. कारण तिला लहानपणापासून सतत काम करण्याची सवय होती. अचानक काम थांबल्यामुळे ती बेचैन झाली होती. तिला वेळ कसा घालवायचा, हेही कळत नव्हतं. याच काळात तिच्या भावाने तिला डिजिटल प्लॅटफॉर्मवर व्हिडिओ बनवण्याचा सल्ला दिला. त्यानंतर जन्नतने कंटेंट क्रिएशनकडे वळण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीला तिने यूट्यूबवर मेकअप, हेअरस्टाइल आणि लाइफस्टाइलशी संबंधित व्हिडिओ बनवायला सुरुवात केली. नंतर ती इंस्टाग्रामवर सक्रिय झाली आणि रील्स बनवू लागली. हळूहळू जन्नतची लोकप्रियता वाढत गेली आणि ती डिजिटल जगतात मोठं नाव बनली. आज तिचे इंस्टाग्रामवर ५० दशलक्षांहून अधिक फॉलोअर्स आहेत. ब्रँड कोलॅबोरेशन, जाहिराती आणि सोशल मीडिया कंटेंटमुळे ती दरवर्षी कोट्यवधी रुपयांची कमाई करते. रिपोर्ट्सनुसार, जन्नत जुबैरची एकूण संपत्ती सुमारे २५० कोटी रुपये आहे. त्यामुळे ती भारतातील सर्वात श्रीमंत आणि जास्त मानधन घेणाऱ्या टीव्ही अभिनेत्रींपैकी एक मानली जाते. सध्या ती 'लाफ्टर शेफ्स' या शोमध्येही दिसत आहे, ज्यासाठी ती एका एपिसोडसाठी १ ते २ लाख रुपये मानधन घेत असल्याचं सांगितलं जातं. याशिवाय जन्नतने 'नाझ' नावाने ज्वेलरी व्यवसायही सुरू केला आहे, जो तिच्या आईच्या नावावर आहे. तसेच ती लवकरच 'ग्लोरी' या मालिकेतही दिसणार आहे, जी ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार आहे. जन्नत जुबैरची ही यशोगाथा दाखवते की, योग्य वेळी योग्य निर्णय घेतला तर करिअरमध्ये मोठं यश मिळवता येतं. टीव्ही सोडून डिजिटल प्लॅटफॉर्मची निवड करणं हा तिच्यासाठी टर्निंग पॉइंट ठरला आणि आज ती कोट्यवधींची मालकीण बनली आहे.

# RCB च्या तिकीटांचा 'काळाबाजार'

## स्टेडियममधील कँटीन कर्मचाऱ्याला अटक करून 100 तिकीटं जप्त

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**IPL 2026च्या हंगामात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या (RCB) तिकिटांचा काळाबाजार उघडकीस आला असून, या प्रकरणामुळे खळबळ उडाली आहे. बेंगळुरूतील एम. चिन्नास्वामी स्टेडियम मध्येच हा प्रकार घडत असल्याचं समोर आलं आहे.**

स्टेडियममधील 'श्री लक्ष्मी कँटीन'मध्ये काम करणारा चंद्रशेखर नावाचा कर्मचारी RCB विरुद्ध Lucknow Super Giants सामन्याची तिकिटं काळ्या बाजारात विकत होता. ही तिकिटं मूळ किमतीपेक्षा खूप जास्त दराने सुमारे ₹15,000 ते ₹19,000 विकली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून आरोपी चंद्रशेखरला अटक केली. त्याच्याकडून जवळपास 100 तिकिटं जप्त करण्यात आली आहेत. या प्रकरणाचा तपास सध्या सेंट्रल क्राइम ब्रांचकडून सुरू आहे.



चौकशीदरम्यान चंद्रशेखरने सांगितलं की, ही तिकिटं त्याला Karnataka State Cricket Association शी संबंधित गणेश परीक्षित नावाच्या व्यक्तीकडून मिळाली होती. जास्त नफा मिळवण्यासाठी ही तिकिटं महागात विकण्यास सांगितलं होतं, असा आरोप आहे.

सध्या गणेश परीक्षित फरार असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत. या प्रकरणात काही खासगी कंपन्यांच्या संचालकांवरही तिकिटांच्या बेकायदेशीर विक्रीत सहभाग असल्याचा संशय आहे. याबाबत FIR नोंदवण्यात आली आहे.

### RCB ची दमदार कामगिरी

मैदानावर मात्र RCB चा खेळ जोरात आहे. आतापर्यंत खेळलेल्या 5 सामन्यांपैकी 4 सामने त्यांनी जिंकले आहेत. सनरायझर्स हैदराबाद, चेन्नई सुपर किंग्स, मुंबई इंडियन्स आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यावर त्यांनी विजय मिळवला, तर एकमेव पराभव राजस्थान रॉयल्स विरुद्ध झाला. दरम्यान, कर्नाटकमध्ये IPL तिकिटांबाबत आधीपासूनच वाद सुरू आहे. उपमुख्यमंत्री डी. के. शिवकुमार यांनी आमदारांना प्रत्येकी तीन तिकिट देण्याची घोषणा केली होती.




कोहली- पडिक्कलच्या अर्धशतकाच्या बळावर हैदराबादवर मिळवला दमदार विजय

# पाकिस्तानची नव्या कसोटी कोचची घोषणा; निवृत्त खेळाडूवर मोठी जबाबदारी

**महाईन्यूज । पाकिस्तान**

**पाकिस्तानने मे महिन्यात बांगलादेशविरुद्ध होणाऱ्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी नवीन प्रशिक्षक मंडळाची घोषणा केली आहे. माजी कर्णधार सरफराज अहमद याची मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सरफराज गेल्या महिन्यात आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाला. माजी कसोटी फलंदाज असद शफीक याची फलंदाजी प्रशिक्षक म्हणून, तर माजी वेगवान गोलंदाज उमर गुल याची प्रशिक्षक म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.**



नव्या कोचिंग स्टाफअंतर्गत पाकिस्तान संघाचा कर्णधार शान मसूद कायम असणार आहे. सरफराज अहमदने २०१७ ची चॅम्पियन्स ट्रॉफी जिंकणाऱ्या पाकिस्तान संघाचे नेतृत्व केले होते. अलीकडेच त्याने इंग्लंड लायन्सविरुद्ध पाकिस्तान शाहीन संघाचं मार्गदर्शक/व्यवस्थापक म्हणून काम पाहिलं. सरफराज अहमद गेल्या महिन्यात आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्त झाला. तेव्हापासून, त्याची मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती होईल अशी जोरदार चर्चा सुरू होती.

### बांगलादेश कसोटीसाठी पाकिस्तान संघ

शान मसूद (कर्णधार), अब्दुल्ला फजल, अहमद बट, अझान अवेस, बाबर आझम, हसन अली, इमाम-उल-हक, खुर्रम शहजाद, मोहम्मद अब्बास, मोहम्मद रिझवान (यष्टीरक्षक), मोहम्मद गाझी घोरी (यष्टीरक्षक), नोमान अली, साजिद खान, सलमान अली आगा, सौद शकील आणि शाहीन शाह आफ्रिदी

फलंदाजी प्रशिक्षक म्हणून निवड झालेल्या असद शफीकने पाकिस्तानसाठी ७७ कसोटी सामने खेळले असून, त्यात १२ शतकांसह ४६६० धावा केल्या आहेत. त्याने आणि उमर गुलने तिन्ही फॉरमॅटमध्ये मिळून एकूण ४२७ बळी घेतले आहेत. आता हे पाकिस्तानचे तीन दिग्गज एकत्र काम करणार आहेत.

पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने या मालिकेसाठी संघाची घोषणा केली आहे. पाकिस्तानने १६ सदस्यीय संघ निवडला असून, त्यात चार नवीन खेळाडूंचा समावेश आहे. अब्दुल्ला फजल, अहमद बट, आझान अवैस आणि गाझी घोरी हे संघात नवीन खेळाडू आहेत. विशेष म्हणजे, गाझी घोरी वगळता इतर तिघांनी अद्याप आंतरराष्ट्रीय सामना खेळलेला नाही. दौऱ्यापूर्वी, संघ २७ एप्रिल ते १ मे पर्यंत कराचीमध्ये शिबिर घेईल.

पीएसएलच्या अंतिम सामन्यानंतर खेळाडू संघात सामील होतील आणि २ मे रोजी बांगलादेशसाठी रवाना होतील. दोन कसोटी सामने ढाका आणि सिल्हेट येथे खेळवले जातील. पहिला कसोटी सामना ८ ते १२ मे दरम्यान तर दुसरा सामना १६ ते २० मे दरम्यान खेळवला जाणार आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। रविवार ।
दि. 19 एप्रिल 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

२५ किल्ल्यांच्या अश्वारोहण मोहिमेचा होणार उद्या प्रारंभ; हिंदूभूषण स्मारक ट्रस्ट अन् दिग्विजय प्रतिष्ठानचा पुढाकार

# ‘स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण’ येथून आता शिवचरित्र प्रसार अभियान

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**छत्रपती शिवाजी महाराज यांच्या तेजस्वी वारशाचा जागर करत, “शिवचरित्र प्रसार अभियान” अंतर्गत स्वराज्यातील २५ ऐतिहासिक किल्ल्यांची प्रेरणादायी अश्वारोहण मोहिमेचा प्रारंभ करण्यात येणार आहे. मोशी येथील स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण परिसरातून ही मोहीम सुरू होणार असून, हिंदुभूषण स्मारक ट्रस्ट आणि दिग्विजय प्रतिष्ठानच्या रजत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित केली आहे.**




छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा इतिहास केवळ पुस्तकांत नाही, तर आपल्या कृतीतून जिवंत ठेवण्याची जबाबदारी प्रत्येकाची आहे. ही अश्वारोहण मोहिम म्हणजे पराक्रम, संस्कृती आणि स्वाभिमान यांची नव्या पिढीपर्यंत पोहोचवणारी प्रेरणायात्रा आहे. यामध्ये शिव-शंभूप्रेमींनी अभिमानाने सहभागी व्हावे, असे आवाहन करतो.

– **महेश लांडगे,** अध्यक्ष, हिंदूभूषण स्मारक ट्रस्ट.

संस्कृती, स्वातंत्र्य, स्वराज्य आणि समृद्धी या मूल्यांची सांगड घालत, या उपक्रमाचा उद्देश इतिहास, परंपरा आणि अश्वविद्या यांचा संगम साधून समाजात स्वाभिमान जागवणे व नव्या पिढीला प्रेरणा देणे हा आहे. उद्घाटन प्रसंगी मान्यवरांसह शेकडो शिवप्रेमी उपस्थित राहणार आहेत.

या मोहिमेत सहभागी घोडेस्वार पुढील काही दिवसांत स्वराज्यातील २५ ऐतिहासिक किल्ल्यांना भेट देणार असून, मार्गावरील किल्ले व नद्यांमधून पवित्र जलसंकलन करणार आहेत. तसेच, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांशी संवाद साधत इतिहास व सांस्कृतिक वारशाबाबत जागृती निर्माण केली जाणार आहे.

महाराष्ट्रात अश्वारोहण क्रीडाप्रकाराचा प्रसार व लोकप्रियता वाढवणे, तसेच स्थानिक नागरिकांच्या सहभागातून पारंपरिक सांस्कृतिक कार्यक्रम सादर करणे, हीदेखील या मोहिमेची वैशिष्ट्ये आहेत. देशभरातून सहभाग वाढवण्यासाठी राष्ट्रीय पातळीवरील ऑनलाइन स्पर्धाही आयोजित करण्यात आली आहे.

हिंदूभूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष तथा आमदार महेश किसनराव लांडगे आणि सिल्व्हर ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक संतोष सीताराम बारणे यांच्या उपस्थितीत मोहिमेला हिरवा कंदील दाखवण्यात येणार आहे. सोशल मीडिया, छापील माध्यमे आणि डिजिटल व्यासपीठांवर या उपक्रमाची व्यापक प्रसिद्धी करण्यात येणार आहे.

“शिवचरित्र प्रसार अभियान” ही केवळ एक मोहिम नसून, स्वराज्याच्या वैभवाची पुनर्स्मृती जागवणारा आणि तरुणाईला इतिहासाशी जोडणारा एक सशक्त सांस्कृतिक सेतू निर्माण करण्याचा संकल्प या निमित्ताने केला आहे. या उपक्रमातून स्वराज्याची प्रेरणा घराघरात पोहोचवण्याचा दृढ निर्धार व्यक्त करण्यात आला आहे.

इतिहास जपणे म्हणजे केवळ भूतकाळाची आठवण ठेवणे नव्हे, तर त्यातून प्रेरणा घेऊन भविष्य घडवणे होय. ‘शिवचरित्र प्रसार अभियान’ ही आपल्या संस्कृती, परंपरा आणि स्वाभिमान यांना नव्या पिढीपर्यंत पोहोचवणारी एक सशक्त चळवळ आहे.

– **संतोष बारणे,** संचालक, सिल्व्हर ग्रुप.

## पिंपरीसाठी नवीन इलेक्ट्रिकल सबस्टेशन उभारावे; आमदार अमित गोरखे यांची मागणी

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील वीज वितरण समस्यांबाबत बैठक मेघना बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली प्रकाश भवन, सेनापती बापट मार्ग, पुणे येथे पार पडली. अमित गोरखे यांनी पिंपरी शहरातील विविध समस्यांवर प्रकाश टाकला. यात प्रामुख्याने पिंपरी शहरासाठी नवीन इलेक्ट्रिकल सबस्टेशन उभारण्यात यावे, ही मुख्य मागणी त्यांनी केली.**



पिंपरी शहरातील संभाजीनगर, काळभोरनगर, विद्यानगर, दत्तनगर, इंदिरानगर, शंकरनगर, मोरवाडी, आकुर्डी, प्राधिकरण, पिंपरी गाव, दापोडी, संत तुकाराम नगर परिसर व भागांमध्ये अलीकडे वीजपुरवठा वारंवार खंडित होण्याच्या समस्या मोठ्या प्रमाणावर जाणवत आहेत. सदर भागांना सध्या टाटा टेल्को उपकेंद्रामार्फत वीजपुरवठा केला जात असून त्याच उपकेंद्रावरून चाकण, आनंदी, तबादले जाधववाडी, चिखली या दूरच्या भागांनाही वीजपुरवठा होत असल्याने त्या उपकेंद्रावर अतिरिक्त ताण निर्माण झाला आहे. यामुळे पिंपरी शहरासाठी इलेक्ट्रिकल सबस्टेशन आवश्यक आहे अशी मागणी केली, यावेळी आमदार गोरखे यांनी केली. शहरामध्ये नागरिकांना मोठ्या प्रमाणात विजेच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. यावर तोडगा म्हणून पिंपरीसाठी नवीन इलेक्ट्रिकल सबस्टेशन उभारणे, हा एकमेव पर्याय असल्याचे देखील आमदार अमित गोरखे यांनी स्पष्ट केले आहे.

# किवळेतील कचरा वाहतूक केंद्र स्थलांतराचा प्रस्ताव

## सर्वसाधारण सभेच्या निर्णयाकडे लक्ष : नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर!

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**किवळे प्रभाग क्रमांक १६ मधील सर्व्हे नं. ६६, आरक्षण क्र. ४/१०३ येथे सध्या कार्यरत असलेल्या कचरा वाहतूक केंद्रामुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याचा मुद्दा समोर आला आहे. या संदर्भात भाजपाचे नगरसेवक कुणाल वाव्हळकर व नगसेवक उत्तमराव केंदळे यांनी प्रस्ताव सादर केला असून, शहर सुधारणा समितीच्या ठराव क्र. ४ दिनांक ०८/०४/२०२६ अन्वये यावर चर्चा झाली आहे.**




सदर ठिकाणाच्या परिसरात सुमारे एक हजाराहून अधिक कुटुंबांची वस्ती आहे. याशिवाय देहूरोड येथील ॲम्युनेशन डेपो (दारुगोळा साठा केंद्र) जवळच असल्याने संभाव्य अपघाताच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षिततेबाबत अधिकच गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.

कचरा वाहतूक केंद्रामुळे परिसरात दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव आणि संसर्गजन्य आजारांचा धोका मोठ्या प्रमाणात वाढल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. डेंग्यू, मलेरिया, श्वसनाचे विकार, त्वचारोग यांसारख्या आजारांचा धोका सातत्याने वाढत असून, विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

याशिवाय या केंद्रावर यापूर्वी अनेक वेळा आग लागल्याच्या घटनाही घडल्या आहेत. ॲम्युनेशन डेपोच्या निकटतेमुळे अशा घटनांमुळे मोठ्या प्रमाणात जीवित व वित्तहानी होण्याचा धोका नाकारता येत नाही, असे देहूरोड ॲम्युनेशन डेपो प्रशासनानेही पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला दिलेल्या लेखी पत्रात स्पष्ट केले आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षिततेच्या दृष्टीने सदर कचरा वाहतूक केंद्राचे स्थलांतर सर्व्हे नं. ८, आरक्षण क्र. ४/१६२ (मैलाशुद्धीकरणासाठी आरक्षित जागा) येथे करण्याची शिफारस करण्यात आली आहे. तसेच रिक्त होणाऱ्या आरक्षण क्र. ४/१०३ या जागेवर अग्निशमन केंद्र उभारणे किंवा नागरिकांसाठी क्रीडा व आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी बॅडमिंटन हॉल उभारण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला आहे. या प्रस्तावावर अंतिम निर्णय घेण्यासाठी तो महानगरपालिका सभेपुढे मान्यतेसाठी सादर करण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.



“ किवळे परिसरातील नागरिकांचे आरोग्य आणि सुरक्षितता ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. कचरा वाहतूक केंद्रामुळे निर्माण झालेल्या समस्यांचा गांभीर्याने विचार करून योग्य ठिकाणी स्थलांतराचा प्रस्ताव आम्ही पुढे नेला आहे. प्रशासनाने यावर तातडीने निर्णय घेऊन नागरिकांना दिलासा द्यावा, यासाठी आमचा सातत्याने पाठपुरावा राहील.

– **कुणाल ओव्हाळकर**, नगरसेवक, भाजपा.

---

# ‘राजा शिवाजी’ चित्रपटाचे पिंपरी-चिंचवडमध्ये दणक्यात ‘प्रमोशन’

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवडमधील थोपटे लॉन्स येथे आगामी मराठी चित्रपट ‘राजा शिवाजी’ च्या प्रचारासाठी भव्य आणि दिमाखदार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रसिद्ध अभिनेते, दिग्दर्शक आणि निर्माते रितेश देशमुख यांची विशेष उपस्थिती लाभली होती. कार्यक्रमात शिवगर्जनेच्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.**




“आपला आवाज”, “आपली सखी महिला मंच” आणि JIO STUDIOS यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे नियोजन “आपला आवाज आपली सखी”च्या संचालिका संगिता तराडे यांनी केले.

या सोहळ्याला पिंपरी-चिंचवडचे महापौर रवी लांडगे, भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे (बापू काटे) तसेच स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी उपस्थित राहून रितेश देशमुख यांचे स्वागत केले.

यावेळी बोलताना शत्रुघ्न (बापू) काटे यांनी “राजा शिवाजी” चित्रपटाचे कौतुक करत म्हटले की, “छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ आमचे आराध्य दैवत नाहीत, तर ते आमचा श्वास आहेत. त्यांच्या विचारांचा प्रसार करण्यासाठी चित्रपट हे प्रभावी माध्यम आहे. रितेशजींचा हा प्रयत्न महाराष्ट्राचा स्वाभिमान जागतिक स्तरावर पोहोचवणारा आहे.”



### चित्रपटाबद्दल उत्सुकता वाढली

या कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी रितेश देशमुख यांच्याशी संवाद साधून चित्रपटाच्या निर्मिती प्रक्रियेबद्दल माहिती घेतली. शिवकालीन इतिहास पडद्यावर साकारण्यासाठी त्यांनी घेतलेल्या मेहनतीचे सर्वांनी कौतुक केले. हा चित्रपट मराठी चित्रपटसृष्टीत नवा विक्रम प्रस्थापित करेल आणि शिवरायांची कीर्ती पुन्हा घराघरात पोहोचवेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला. थोपटे लॉन्स येथे आयोजित या कार्यक्रमाला शिवप्रेमी आणि चाहत्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली. कार्यक्रमाच्या माध्यमातून “राजा शिवाजी” चित्रपटाबद्दल प्रचंड उत्सुकता निर्माण झाली असून, देशभर शिवविचारांचा जागर होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# अनधिकृत बांधकामांविरोधात महापालिकेची कारवाई सुरूच

## तीन दिवसांत ४५ हजार २८९ चौरस फूट अतिक्रमण हटविले; अतिक्रमणांविरोधात धडक कारवाई

**महाईन्यूज। पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब, क, इ, ग, व फ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत १५ ते १७ एप्रिल २०२६ रोजी अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांविरोधात धडक निष्कासन कारवाई करण्यात आली. या कारवाईत एकूण ४६ अनधिकृत बांधकामे व पत्राशेड निष्कासित करण्यात आले असून सुमारे ४५ हजार २८९ चौरस फूट क्षेत्रफळावरील अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे हटविण्यात आली.**




नागरिकांच्या सुरक्षेच्या तसेच शहराच्या नियोजनबद्ध विकासाच्या दृष्टीने ही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात आली.

'ब' क्षेत्रीय कार्यालयामार्फत दि. १७ एप्रिल २०२६ रोजी प्रभाग क्र. १८ चिंचवड येथे एकूण ९ अनधिकृत पत्राशेड व बांधकामांवर निष्कासन कारवाई करण्यात आली. या कारवाईत सुमारे २१,७९८ चौरस फूट क्षेत्रफळावरील अतिक्रमण हटविण्यात आले.

'क' क्षेत्रीय कार्यालयामार्फत दि. १६ एप्रिल रोजी प्रभाग क्र. ६ भोसरी, सद्गुरूनगर परिसरात ३ अनधिकृत पत्राशेड (१६२ चौरस फूट) तसेच प्रभाग क्र. २ पुणे-नाशिक महामार्ग, बोऱ्हाडेवाडी परिसरात ४ पत्राशेड (१,५५० चौरस फूट) यावर निष्कासन कारवाई करण्यात आली. तसेच दि. १७ एप्रिल रोजी प्रभाग क्र. ६ भोसरी, सद्गुरूनगर परिसरातील ३ अनधिकृत आरसीसी बांधकामांवर कारवाई करून सुमारे २,०९९ चौरस फूट क्षेत्रफळ मोकळे करण्यात आले.

'ई' क्षेत्रीय कार्यालयांतर्गत दि. १७ एप्रिल रोजी प्रभाग क्र. ०३ मौजे मोशी/डूडूळगाव येथे धडक कारवाई पथकाद्वारे १ अनधिकृत पत्राशेड बांधकामावर कारवाई करण्यात आली. या कारवाईत अंदाजे ६५० चौरस फूट क्षेत्रफळावरील अतिक्रमण हटविण्यात आले.'फ' क्षेत्रीय कार्यालयामार्फत दि. १६ एप्रिल रोजी चिखली येथील प्राईम पार्क, शेलार वस्ती परिसरात नियमबाह्य व्यावसायिक बांधकामे व अतिक्रमणांविरोधात कारवाई करण्यात आली. या कारवाईत सुमारे ३,६६० चौरस फूट क्षेत्रफळावरील ८ अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली. 'ग' क्षेत्रीय कार्यालयामार्फत दि. १५ एप्रिल रोजी प्रभाग क्र. २७ मधील सिंहगड कॉलनी, सज्जनगड कॉलनी, ज्ञानदीप कॉलनी, न्यू डी.पी. रस्ता, शिवालय कॉलनी, रहाटणी येथे सुमारे ४,११२ चौरस फूट क्षेत्रफळावरील ७ अनधिकृत पत्राशेड व बांधकामांवर तसेच नाल्यावरील अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली. त्यानंतर दि. १६ एप्रिल रोजी प्रभाग क्र. २४ व २७ मधील विविध ठिकाणी करण्यात आलेल्या कारवाईत सुमारे ५,४११ चौरस फूट क्षेत्रफळावरील ४ अतिक्रमणे हटविण्यात आली. तसेच दि. १७ एप्रिल रोजी प्रभाग क्र. २३ व २१ मधील विविध ठिकाणी करण्यात आलेल्या कारवाईत सुमारे ५,८४६ चौरस फूट क्षेत्रफळावरील ७ अनधिकृत बांधकामे व पत्राशेड निष्कासित करण्यात आली.

### अतिक्रमण कारवाई कठोर करणार!

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या आदेशान्वये तसेच अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली. तर क्षेत्रीय अधिकारी राजाराम सरगर, अजिंक्य येळे, तानाजी नरळे, अतुल पाटील, किशोर ननवरे यांच्या अधिपत्याखाली उपअभियंते, धडक कारवाई पथक, बीट निरीक्षक, एम. एस. एफ जवान, पोलीस कर्मचारी, महापालिका मजूर, ठेकेदार यांच्या सहाय्याने ही कारवाई करण्यात आली. तसेच अतिक्रमण हटविण्यासाठी जेसीबी ब्रेकर, ट्रॅक्टर ब्रेकर आदी उपकरणांचा वापर करण्यात आला. दरम्यान, महानगरपालिकेकडून अशा प्रकारच्या अतिक्रमणांविरोधातील कारवाई सातत्याने सुरू राहणार असून अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

# दिघीत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**महाईन्यूज। पिंपरी-चिंचवड**

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून दिघी गावात गरजू विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला.**



माजी नगरसेवक विकास हरिश्चंद्र डोळस व नगरसेविका श्रुती विकास डोळस यांच्या मार्गदर्शनाखाली संघर्ष स्पोर्ट्स क्लब आणि कपिलवस्तू बुद्ध विहार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने एकूण १३५ विद्यार्थ्यांना शैक्षणिक किटचे वितरण करण्यात आले. या किटमध्ये स्कूल बॅग, सहा वह्यांचा संच, कंपास बॉक्स आणि पेन आदी शैक्षणिक साहित्याचा समावेश होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" या संदेशाला अनुसरून हा उपक्रम सामाजिक बांधिलकीतून राबविण्यात आला. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना मिळावी, तसेच त्यांच्या शिक्षण प्रवासात कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, हा या उपक्रमामागील उद्देश असल्याचे आयोजकांनी सांगितले.

या वेळी बोलताना माजी नगरसेवक विकास डोळस यांनी, "डॉ. आंबेडकरांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साधने देणे हीच खरी मानवंदना आहे," असे मत व्यक्त केले.

या कार्यक्रमास नगरसेविका श्रुती डोळस, संघर्ष स्पोर्ट्स क्लबचे पदाधिकारी, कपिलवस्तू बुद्ध विहार समितीचे सदस्य तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. शैक्षणिक साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसून आला. या उपक्रमाचे दिघी परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे.

# 'प्रियदर्शनी स्कूल'मध्ये 'मिशन रेबीज' अंतर्गत जनजागृती

**महाईन्यूज। पिंपरी-चिंचवड**

**प्रियदर्शनी स्कूल, मोशी येथे इयत्ता १ ली ते ४ थीच्या विद्यार्थ्यांसाठी MISSION RABIES या संस्थेमार्फत रेबीज जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले.**



या सत्राचा उद्देश विद्यार्थ्यांना रेबीज आजाराविषयी माहिती देणे, त्याची कारणे, लक्षणे तसेच प्रतिबंधात्मक उपाय समजावून सांगणे हा होता. आकर्षक सादरीकरणे, व्हिडिओ आणि संवादात्मक उपक्रमांद्वारे तज्ज्ञांनी रेबीजचा प्रसार कसा होतो आणि वेळेवर लसीकरणाचे महत्त्व काय आहे हे सोप्या भाषेत स्पष्ट केले. विद्यार्थ्यांना प्राण्यांजवळ सुरक्षितपणे कसे वागावे तसेच कुत्र्याने चावा घेतल्यास कोणती काळजी घ्यावी याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. "दुर्लक्ष करू नका, त्वरित उपचार घ्या" हा महत्त्वाचा संदेश या सत्रातून देण्यात आला.

विद्यार्थ्यांनी या सत्रात उत्साहाने सहभाग घेतला. शाळेच्या व्यवस्थापनाने MISSION RABIES संस्थेचे आभार मानून अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये लहान वयातच आरोग्याविषयी जागरूकता निर्माण होत असल्याचे सांगितले.

# पर्यावरण संवर्धनासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग महत्त्वाचा

## पर्यावरणपूरक सवयी रुजवण्यासाठी बॉटल्स फॉर चेंजसारखे नावीन्यपूर्ण उपक्रम अत्यंत महत्वाचे

**महाईन्यूज ।**
**पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी चिंचवड शहरात पर्यावरणपूरक सवयी रुजवण्यासाठी बॉटल्स फॉर चेंजसारखे नावीन्यपूर्ण उपक्रम अत्यंत महत्वाचे आहेत. नागरिकांमध्ये पर्यावरणाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी ते प्रभावी ठरतात. त्याचबरोबर प्लास्टिक कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन, पुनर्वापर आणि पर्यावरण संवर्धनासाठी नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवणे गरजेचे आहे, असे मत महापौर रवि लांडगे यांनी व्यक्त केले.**



पिंपरी चिंचवड शहरात प्लास्टिक कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका आणि बिसलेरी इंटरनॅशनल यांच्या संयुक्त विद्यमाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत बॉटल एक्सचेंज उपक्रमांतर्गत पुनर्वापरित प्लास्टिकपासून तयार करण्यात आलेल्या बसण्याच्या बाकड्यांचे आणि कचरा संकलन डब्यांचे आज महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

महापालिका मुख्यालय परिसरात झालेल्या या कार्यक्रमास सह आयुक्त मनोज लोणकर, उप आयुक्त डॉ. प्रदीप ठेंगल, राजेश आगळे, सहायक आरोग्य अधिकारी अंकुश झिटे, मुख्य आरोग्य निरीक्षक वैभव घोळवे तसेच बिसलेरीचे सस्टेनेबिलिटी व कॉर्पोरेट अफेअर्स संचालक के. गणेश, पूजा शिंदे, आप्पासाहेब धनवे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमादरम्यान शहरातील आठ शैक्षणिक संस्थांना प्लास्टिक कचरा संकलनात सातत्यपूर्ण योगदान दिल्याबद्दल सन्मानित करण्यात आले.

महापौर रवि लांडगे म्हणाले, 'पिंपरी चिंचवड महापालिका आणि बिसलेरी यांची भागीदारी ही पर्यावरण संरक्षणासाठी आदर्श उदाहरण आहे.

या उपक्रमामुळे लँडफिलमध्ये जाणारा कचरा कमी होऊन नागरिकांमध्ये कचरा व्यवस्थापनाबाबत जागरूकता निर्माण होईल. प्लास्टिक कचऱ्याचे योग्य संकलन व पुनर्वापर ही काळाची गरज असून, प्रत्येक नागरिकाने या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवणे अत्यंत आवश्यक आहे. शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक ठेवण्यासाठी महापालिका सातत्याने अशा उपक्रमांना प्रोत्साहन देत राहील.

दरम्यान, महापौर रवि लांडगे, उपमहापौर शर्मिला बाबर, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात येत असलेल्या या उपक्रमामुळे शहरात कचरा संकलन व पुनर्वापर याबाबत जनजागृती वाढण्यास मदत होणार असून, २०२५-२६ या वर्षात तब्बल २१९ मेट्रिक टन प्लास्टिक कचरा संकलित करण्यात आला आहे. तसेच, देशभरात याच उपक्रमातून २८ हजार ६४५ टन प्लास्टिक कचरा पुनर्वापरासाठी पाठविण्यात आला आहे. हा उपक्रम बिस्लेरी हरित संकल्प या अभियानाचा भाग असून, प्लास्टिक पुनर्वापर, जलसंवर्धन आणि शाश्वत कचरा व्यवस्थापन प्रणाली उभारण्यावर भर देण्यात येत आहे.

> “ शाश्वत आणि संसाधन-कार्यक्षम पिंपरी चिंचवड शहर उभारण्यासाठी अशा उपक्रमांची गरज आहे. बॉटल्स फॉर चेंज या अभिनव उपक्रमामुळे आपल्या प्रयत्नांना अधिक गती मिळत आहे. प्लास्टिक कचऱ्याचे वैज्ञानिक पद्धतीने व्यवस्थापन, पुनर्वापर आणि पुनर्निर्मिती यावर भर देत आम्ही एक सक्षम व दीर्घकालीन प्रणाली उभारण्याच्या दिशेने वाटचाल करत आहोत. नागरिकांचा सहभाग आणि संस्थात्मक सहकार्य यामुळेच हे उद्दिष्ट साध्य होणार असून, भविष्यात अशा अधिक उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येईल.
>
> – **डॉ. प्रदीप ठेंगल,** उप आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका.

# नामदार शिवेंद्रराजेंकडून जावळीला झुकते माप; सौरभ शिंदेंना डबल लॉटरी

**महाईन्यूज ।** कुडाळ

**सातारा जिल्हा परिषदेतील विषय समित्यांच्या सदस्यांची आज निवड करण्यात आली असून, इतिहासात पहिल्यांदाच जावळी तालुक्यातील तीन पदाधिकाऱ्यांना विविध समित्यांमध्ये काम करण्याची मोठी संधी राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या सहकार्याने मिळाली आहे.**





नामदार शिवेंद्रराजे यांनी जावळी तालुक्याला झुकते माप देताना म्हसवे गटातून निवडून आलेले वसंतराव मानकुमरे यांची स्थायी समितीवर, तर जावली पंचायत समितीचे नुतन सभापती सौरभबाबा शिंदे यांची बांधकाम समितीवर व कुडाळ गटातून निवडून आलेल्या सदस्या जयश्री गिरी यांची महिला बालकल्याण व आरोग्य समितीवर निवडी करून जावली तालुक्याचा एक प्रकारे सन्मानच केला आहे. विविध समित्यांमध्ये जावली तालुक्यातील तीन पदाधिकाऱ्यांना संधी मिळाल्याने तालुक्यातील जनतेमध्ये कमालीचा उत्साह निर्णाण झाला असून या निवडीमुळे तालुक्याच्या विकासाला आणखीण बळ मिळणार असल्याची भावना जनतेमधून व्यक्त होऊ लागली आहे. जिल्हा परिषदांच्या स्थायी समिती आणि इतर विषय समित्यांच्या सदस्य निवडीसाठी जिल्हायतील विविध पदाधिकाऱ्यांनी स्थानिक नेतृत्वाकडे जोरदार लॉबिंग करून मागणी केली होती,

सातारा जिल्हा परिषदेत १७ एप्रिल २०२६ रोजी स्थायी समितीसह विविध समित्यांची निवड प्रक्रिया पार पडल्या. ६५ सदस्य संख्या असलेल्या या जिल्हा परिषदेत सभापती निवडीत भाजपने बाजी मारून सर्व सत्तास्थाने आपल्या ताब्यात ठेवली आहेत.जिल्हा परिषद अध्यक्षा डॉ.प्रिया शिंदे यांनी शुक्रवारी विशेष सर्वसाधारण सभेत सहा विषय समित्यांच्या सभापतीपदांचे वाटप जाहीर केले.या बैठकीस मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासह सर्व विभागप्रमुख व सदस्य उपस्थित होते. जावली तालुक्यात तीघांना विविध समित्यांवर काम करण्याची संधी दिल्यामुळे जावली तालुका भाजपचे अध्यक्ष संदिप परामणे यांनी नामदार शिवेंद्रराजे भोसले यांच्यासह जिल्हा परषद अध्यक्ष, उपाध्यक्ष यांचे आभार मानले.

### सौरभ शिंदे यांना दुहेरी संधी

कुडाळ पंचायत समिती गणातून निवडून आलेले सौरभ शिंदे यांची जावली पंचायत समितीच्या सभापतीपदी नुकतीच निवड झाली होती, आज झालेल्या जिल्हा परिषदेच्या विविध समित्यांची निवड प्रक्रियेत सुध्दा त्यांना बांधकाम समितीवर काम करण्याची संधी मिळाल्याने त्यांना राजकीय क्षेत्रात अत्यंत कमी वयात दोन्ही मोठ्या चांगल्या पदांवर काम करण्याची संधी मिळाली असल्याने दुहेरी संधी प्राप्त झाली आहे, त्यांच्या या निवडीमुळे माजी आमदार स्वर्गीय लालसिंगराव शिंदे यांच्या राजकीय घराण्याचा व कुडाळ गावचा योग्य सन्मान झाला असल्याचे बोलले जात आहे.